RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18



# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक ७५(२)] मंगळवार, ऑगस्ट १, २०१७/श्रावण १०, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १२५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**अल्पसंख्याक विकास विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ ऑगस्ट २०१७

अधिसूचना

**वक्फ अधिनियम, १९९५.**

क्रमांक वक्फ. २०१५/प्र.क्र.१४२/कार्यासन-४.—वक्फ अधिनियम, १९९५ (१९९५ चा ४३) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (१) व (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व यासंबंधी प्राप्त असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करून तसेच, यासंबंधी यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्व शासन अधिसूचना अधिक्रमित करून, महाराष्ट्र शासन याद्वारे, एखाद्या वक्फ किंवा वक्फ मालमत्तेशी संबंधित विवाद, प्रश्न व इतर संबंधित बाबींचे निर्धारण करण्यासाठी, एखाद्या भाडेकरूचे निष्कासन किंवा अशा मालमत्ता संदर्भातील भाडेपट्टाकार व भाडेपट्टादार यांच्या अधिकारांचे व बंधनांचे (obligation)चे निर्धारण उक्त अधिनियमांतर्गत करण्यासाठी, संपूर्ण महाराष्ट्र राज्यावर अधिकारिता असलेले, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबादची स्थापना करीत आहे व त्यावर पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट व्यक्तींची त्यांच्या नावापुढे पुढील तक्त्यातील स्तंभ (३) मध्ये विनिर्दिष्ट संवर्गातून सदर न्यायाधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य म्हणून, त्यांनी आपआपल्या पदावर प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती करीत आहे :—

तक्ता

| अ. क्र. (१) | नाव (२) | संवर्ग (३) | अध्यक्ष/सदस्य (४) |
|---|---|---|---|
| १ | अब्दुल सलीम अहमद हुसैन शहापुरे | कलम ८३ मधील उप कलम (४) च्या पोट-कलम (अ) मधील तरतुदींनुसार राज्य न्यायालयीन सेवेतील सदस्य. | अध्यक्ष |
| २ | खालिद बी. अरब | कलम ८३ मधील उप कलम (४) च्या पोट-कलम (ब) मधील तरतुदींनुसार राज्य नागरी सेवेतील अधिकारी. | सदस्य |
| ३ | ॲड. मुहम्मद इक्बाल हुसैन | कलम ८३ मधील उप कलम (४) च्या पोट-कलम (क) मधील तरतुदींनुसार मुस्लीम कायदा व विधितत्वमीमांसाचे ज्ञान असणारी व्यक्ती. | सदस्य |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्याम तागडे,**
शासनाचे प्रधान सचिव.

## MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 1st August 2017.

*NOTIFICATION*

Waqf Act, 1995.

No. Waqf-2015/C.R. 142/Desk-4.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*4*) of section 83 of the Waqf Act, 1995 (43 of 1995) and of all other powers enabling it in that behalf ; and in supersession of all the previous Government Notifications issued in this behalf, the Government of Maharashtra hereby constitutes a the Maharashtra State Waqf Tribunal at Aurangabad, for the determination of any dispute, question or other matter relating to a waqf or waqf property, eviction of a tenant or determination of rights and obligations of the lessor and the lessee of such property, under the said Act, having jurisdiction over whole of the State of Maharashtra and appoints the persons specified in column (2) of the Table appended hereto belonging to the categories specified against them in column (3) of the Table as a Chairman and members of the said Tribunal for a period of five years from the date they assume their respective offices :—

**Table**

| Sr. No. | Name | Categories | Chairman/ Member |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Abdul Saleem Ahmed Hussain Shahapure | Member of the State Judicial Service under clause (a) of sub-section (*4*) of section 83. | Chairman |
| 2 | Khalid B. Arab | Officer from the State Civil Services under clause (b) of sub-section (*4*) of section 83. | Member |
| 3 | Adv. Muhammad Iqbal Hussain | Person having knowledge of Muslim and jurisprudence under clause (c) of sub-section (*4*) of section 83. | Member |

By order and in the name of the Governor of Maharashtra.

SHYAM TAGADE,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.